# डॉक्टर आणि रुग्ण धावणार मॅरेथॉनमध्ये

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

तंदुरुस्त जीवनशैली व हृदयरोगावर मात करण्याचा संदेश देण्यासाठी मुंबई महापालिकेच्या रुग्णालयातील तसेच खासगी रुग्णालयांतील हृदयरोग तज्ज्ञ १५ जानेवारीला होणाऱ्या मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहेत. खासगी रुग्णालयातील किमान १०० रुग्णही मॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहेत.



मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी सध्या अनेकजण दररोज धावण्याचा सराव करीत आहेत. प्रख्यात स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. राकेश सिन्हा मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी जोरदार सराव करीत होते. पण सरावाच्या दरम्यान हृदयविकाराने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर हृदयविकाराच्या रुग्णांचा मॅरेथॉनमधील सहभाग व सराव याचे महत्त्व अधोरेखित झाले. पण हृदयविकाराबाबत जनजागृती करण्यासाठी वेगवेगळ्या रुग्णालयातील हृदयरोग तज्ज्ञ मॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहेत. पालिकेच्या केईएम, सायन व नायर रुग्णालयातील हृदयविकार तज्ज्ञांबरोबरच भूलशास्त्र विभाग, न्युरोसर्जरी विभाग, सर्जरी विभाग अशा वेगवेगळ्या विभागातील डॉक्टर वैयक्तिक पातळीवर यामध्ये सहभागी होतात, असे पालिका रुग्णालयाचे संचालक व केईएम रुग्णालयाचे डीन डॉ. अविनाश सुपे म्हणाले.

एशियन हार्ट इस्टिट्यूटमधील किमान १०० हृदयरोगी यामध्ये धावणार आहेत. पण डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य काळजी घेऊन धावतील. धावणाऱ्यांना काही त्रास झाला तर त्यांची काळजी घेण्यासाठी डॉक्टरांचे पथक तैनात केले जाईल.